सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

(संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

**कालमर्यादित : दि.१५ जुलै २०२३**

**परिपत्रक :** क्रमांक : १०/एडीएम/Intake Approval/२०२३/ ५५२ दिनांक : 12 JUL 2023

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक : क्रमांक : १०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४, दि.१३/६/२०२३

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती संबंधित संस्थांनी दि.२७ जून २०२३ पर्यंत आणि संबंधित विभागीय कार्यालयांनी दि. ३० जून २०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये कळविले होते. अद्यापपर्यंत बऱ्याच संस्थांनी माहिती अद्ययावत केली नसल्याचे व विभागीय कार्यालयांनी पडताळणी केलेली नसल्याचे दिसून येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता विविध पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण वेळापत्रक घोषित करण्यात आलेले आहे. त्यानुसार लवकरच प्रवेश फेऱ्यांची सुरुवात होणार आहे. याकरीता संस्थेची अभ्यासक्रमनिहाय मंजूर प्रवेश क्षमता व अनुषंगिक माहिती अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी सदर माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता सदर माहिती संबंधित संस्थांनी दि.१५ जुलै २०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास अंतिम संधी देण्यात येत आहे. मंजूर प्रवेश क्षमता व अनुषंगिक माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास तसेच माहिती दि.१५ जुलै २०२३ पर्यंत अद्ययावत न केल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि. १७ जुलै २०२३ पर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

३) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

D/Bhadekar/Diploma Adm. 23-24/Intake Approval System Letter